शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४६३ २२-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# वीज ग्राहकांशी सामंजस्याने वागा : खासदार चंद्रकांत खैरे
## जिल्हा विद्युत विद्युतीकरण समिती बैठक

**संभाजीनगर ( ता.२७ ) :** मिटर रिंडीग करणाऱ्या एजन्सी व आऊटसोर्सिगची कामे करणाऱ्या एजन्सी यावर महावितरणचे नियंत्रण राहिलेले नाही या एजन्सीच्या कामावर नियंत्रण ठेवा व चुकीचे कामे करणाऱ्या एजन्सीला हाकला असे आदेश देत विज ग्राहकांशी सामंजस्याने वागा असा सुचना शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी जिल्हा विद्युतीकरण समितीच्या बैठकित दिल्या.

मिलकॉर्नर येथील मुख्य अभियंता संभाजीनगर परिमंडळ यांच्या कार्यालयातील सभागृहात जिल्हा विद्युतीकरण समितीची बैठक खासदार चंद्रकांत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकिस विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, मुख्य अभियंता सतीष चव्हाण, अधिक्षक अभियंता एस एस खंदारे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पी एल सोरमारे, शहर अभियंता एस डी पानझडे, जिल्हायुवाधिकारी ऋषिकेश खैरे, नगरसेवक नंदकुमार घोडेले, गोकुळ मलवे, राजु शिंदे, अंकित विधाते, गणु पांडे, राखी सुरडकर, यु जी शिरसाट, पी आर बनसोडे, ए पी पठाण, अमित कुलकणी, सुनिता रावते, संतोष बोडखे, अमित पुजारी, शिवाजी शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कन्नड, वैजापुर, गंगापुर, पैठण तालुक्यातील विज कनेक्शन व लोंबकाळलेल्या विद्युत तारांची प्रलंबीत कामे जलद गतीने करण्याचे आदेश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित दिले. पोखरी, डोंगरगावच्या उपकेंद्राच्या कामाला गती देण्याच्या सुचना विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांनी दिल्या. मिटररिडीगची वेळ सकाळ संध्याकाळ अशी दोन सत्रात ठेवा आणि डिपीच्या संरक्षणासाठी लोकप्रतिनिधीचा निधी देऊ परंतु त्या संरक्षित करा असेही त्यांनी बैठकित मागणी केली.सोयगाव येथील शाळेच्या मैदानावरील लोंबकाळलेल्या तारा हटवण्याची मागणी संतोष बोडखे यांनी बैठकीत केली. कनेक्शन देण्यात होणारी दिरंगाई टाळा व नागरिकांशी सामंजस्याने वागा असे सांगत महावितरणच्या संबंधात काही गंभीर असल्यास थेट खासदार कार्यालयास किंवा मुख्य अभियंत्याकडे तकार करा परंतु महातिवरणच्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना मारहाण करु नका असे आवाहन खासदार चंद्रकांत खैर यांनी केले. विद्युत अधिनियम २००३ च्या कायदा अत्यंत कडक आहे. त्यानुसार महाविरणच्या कर्मचाऱ्याला मारहाण करणे महागात पडले असेही त्यांनी बैठकित बजावले व मारहाणीने समस्या सुटणार नाही त्यासाठी त्या वरिष्ठांकडे तक्रारी नोंदवा असे आवाहन केले.

शहरा संबंधित डिपीआर तयार करतांना स्थानिक लोकप्रतिनिर्धीना विश्वास घ्यावे व अंडरग्राऊंड केबलींगसाठी पाठपुरावा करणाऱ्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकित दिल्या विद्यापीठ ते कमाई गेट पोल हटवण्याची काम जलदगतीने करण्याच्या सुचना देत मनपाने ही या कामाला गती देण्यासाठी विशेष लक्ष देण्याचे त्यांनी सांगितले. शहर अभियंता सखाराम पानझडे यांनी शहराचे विद्युत बील व त्यासंबधिच्या समस्या बैठकित मांडल्या. नगरसेवक नंदकुमार घोडेले यांनी शाळांची विज तोडणी करु नका अशी मागणी बैठकित केली नगरसेवक ऋषिकेश खैरे यांनी समर्थनगरातील उघड्या डीपीचा प्रश्न बैठकित मांडला. जिल्हा नियोजन समितीकडे बैठकित महावितरणच्या निधीच्या मागण्या नोंदवण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी सोरमारे यांना दिल्या.

**प्रसिध्दी प्रमुख**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525